**अनुकंपा पदभरती बाबत जाहीर प्रगटन**
**जा.क्रं. ३४०/२०२५ दि.१६.०९.२०२५**

जिल्हा परिषद, सोलापूर अंतर्गत गट-ड च्या स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात आलेल्या अनुकंपा प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांनाच सुचित करण्यात येते की, **दिनांक २५/0९/२०२५, वार गुरुवार** रोजी अनुकंपा प्रतिक्षायादीमधील उमेदवारांना जेष्ठता क्रमांक, शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता आणि पदभरतीयोग्य संबंधित संवर्गातील सध्याची रिक्त पदांची स्थिती याआधारे "गट-ड" परिचर संवर्गात अनुकंपा नियुक्ती आदेश देण्यासंदर्भात कार्यवाही समुपदेशनाद्वारे या कार्यालयाकडुन करण्यात येणार आहे.

तरी "गट-ड" च्या स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात आलेल्या अनुकंपा प्रतिक्षा यादीमधील अ.क्रं. 01 ते ४६ पर्यंतच्या उमेदवारांनी दिनांक २५/०९/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.00 वाजता जिल्हा परिषद, सोलापूर अंतर्गत "यशवंतराव चव्हाण सभागृह" येथे आपल्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेचे अदयावत मुळ कागदपत्रे तसेच त्यांची एक छायांकित प्रत घेऊनच न चुकता उपस्थित रहावे. समुपदेशनास उपस्थित रहणारे प्रत्येक उमेदवारास अनुकंपा नियुक्तीचा लाभ मिळेलच असे नाही याची सर्व उमेदवारांनी दक्षता घ्यावी.संदिग्ध अहवाल,अपुर्ण प्रस्ताव ,विलंबाने प्रस्ताव सादर केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.

कुलदीप जंगम (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, सोलापूर.